International Online Physical Education & Sports Research Journal
Academic Sports Scholars
ISSN NO : 2277-3665
Impact Factor : 2.1052 (UIF) [Yr.2014]

ISSN:2277-3665 Impact Factor : 2.9052(UIF) Volume - 5 | Issue - 1 | Jan - 2016






# ऑलिंपिक मधिल भारतीय महिला खेळाडुंचा दर्जा व कामगिरी : एक अध्ययन

[1]राजेश्वर देशमुख , [2]शामल देशमुख
[1]शारिरीक शिक्षण विभाग नागनाथ महाविद्यालय औढा नागनाथ.
[2]समाजशास्त्र विभाग.नागनाथ महाविद्यालय औढा नागनाथ.

***प्रस्तावना :***

भारतीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० ला घटना तयार करण्यात आली त्यानुसार महिलांना समान नागरिकत्वाचे हक्क प्राप्त झाले. वेळोवेळी कायद्यामध्ये बदल करून महिलांना सुखरूप जीवन जगता यावे यासाठी प्रयत्न केले गेले. परंतु काही ठरावीक क्षेत्रे (षैक्षणिक, नर्सिंग व काही व्यवसाय) सोडले तर इतर क्षेत्रात महिला पूढे येवू शकल्या नाहीत व अलिकडच्या काळात पूढे आल्यातरी त्याचे प्रमाण अत्यल्प आहे, त्यामंध्ये क्रिडाक्षेत्राचा उल्लेख करावा लागेल.

भारतात १९ व्या षतकाच्या सुरवातीपासुन स्त्री-षिक्षणाच्या संदर्भात प्रयत्न केले गेले. परंतु ते शहरी विभागापुरतेच मर्यादीत होते. व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी त्याचा सर्वागिंण विकास होणे आवष्यक असते, व त्यासाठी क्रिडात्मक विकास होणे आवष्यक आहे. परंतु भारतामध्ये त्या अनुशंगाने फारसे प्रयत्न झालेले नाहीत व त्यातल्यात्यात महिलांच्या विकासामध्ये खेळाचे महत्व आहे ही बाब लक्षात घेतली जात नाही.

खेळाचे खरे उद्दिश्ट मनोरंजन समजले समजले जाते व मैदानी खेळातुन शारिरीक तंदुरूस्ती होते असे मानले जाते. क्रिडा जीवनावर मनापासुन प्रेम करणारे क्रिडा प्रेमी व खेळाडु कब्बडी, खो-खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल, हॉकी, वेटलिपटींग व क्रिकेट हे खेळ जेवढया तन्मयतेने बघतात तेवढया तन्मयतेने ॲथलेटिक्सकडे बघितले जात नाही. त्यातल्यात्यात ॲथलेटिक्समध्ये पुरूश खेळाडुंचा विचार जास्त केला जातो. महिलांच्या बाबतीत तेवढा केला जात नाही. त्यामुळे भारतीय महिला खेळाडुंची ऑलंपीक मधील दजी व कामगिरी जाणुन घेण्यासाठी प्रस्तुत अध्ययन केले गेले आहे.

***अध्ययनाची उद्दिश्टे व्इरमबजपअमे***

१.ऑलंपीकमधील भारतीय महिला खेळाडुंचा सहभाग असतो का ते जाणुन घेणे.
२.भारतीय महिला खेळाडुंची सामाजीक स्थिती/दर्जा जाणुन घेणे.
३.भारतीय महिला खेळाडुंच्या समस्या जाणुन घेणे.
४.ऑलंपीक मधील भारतीय महिला खेळाडुंच्या कामगिरीचे अध्ययन करणे.
५.ऑलंपीकमध्ये भारतीय महिला खेळाडु कोणत्या क्रिडाप्रकारात सहभागी होतात याचे अध्ययन करणे.

## ✍ संशोधन पध्दती

तथ्यसंकलनासाठी व्दितीय तंत्र वापर करण्यात आलेल आहे.

- ✍ गृहीतके
- ✍ ऑलंपीकमध्ये भारतीय महिलांचा सहभाग कमी आहे.
- ✍ ऑपंलीकमध्ये भारतीय महिलांना फारच कमी प्रमाणात पदक प्राप्त होतात.
- ✍ भारतीय महिला खेळाडुंना प्रोत्साहन कमी मिळणे
- ✍ भारतीय महिला खेळाडुंच्या निवड प्रक्रियेंमध्ये राजीकय हस्तक्षेप आहे काय!

## ✍ ऑलंपीकचा इतिहास

ऑलंपीक या षब्दाचा उल्लेख प्रामुख्याने ऑलंपीया या नावाच्या गावापासुन झालेला दिसुन येतो. हे गाव ग्रीकमध्ये असुन निसर्गसौदंर्य व रम्यस्थळासाठी प्रसिध्द आहे.व हे गाव एका टेकडीवर वसलेले एक छोटेसे खेडे आहे. या गावाच्या आजुबाजुनी वाहणा–या दोन नद्या व पाईन, ऑलिव्ह झाडामुळे त्याच्या सौदंर्यात अधिकच भर पडलेली दिसुन येते. त्या झाडांना धार्मीक महत्व देखील आहे. या गावाच्या परिसरात झिजस देवतेचा अतिभव्यदगड व हसतीदंतांनी बनलेला ४० फुट उंचीचा भव्य पुतळा जगातील सात आष्चर्यापैकी एक आष्चर्य आहे. या संदर्भात काही दंतकथा सांगीतल्या जातात. पहिली दंतकथा केरेनाईस या महिलेने मुलाचा खेळ पाहाण्यासाठी पुरूशांच्या पोशाखात जाऊन स्पर्धा पाहीली. परंतु ते उघडकीस आल्यामुळे असे कृत्य पुन्हा घडू नये म्हणून महिलांना मैदानात येण्यासबंदी करण्यात आली. परंतु कालांतराने महिलांना प्रेक्षक म्हणुन येण्यास संधी देण्यात आली.

एकंदरीत ऑलंपीकची परंपरा प्राचीन असली तरी इ.पू. ७७६ ची स्पर्धा ही पहिली स्पर्धा समजली जाते. त्यावेळी ऑलंपीक विजयी स्पर्धकास ऑलीव्ह झाडाच्या फांदीचा मुकुट दिला जात असे. या बाबत एकमत आढळून येत नाही.

## ✍ दुसरी दंतकथा

प्रचिन ग्रीक स्पर्धामध्ये १० व्या षतकात अॅथेन्समध्ये ऑलंपीक स्पर्धांना सुरवात झाली असे मानले जाते. परंतु त्यामंध्ये महिलांना प्राध्यान्य नव्हते. राजकन्या हिम्पोडोमीयासी चा विवाह करण्यासाठी रथांची षर्यत लावलेली होती व विकोप्सने ही षर्यत जिंकल्याच्या आनंदीप्रित्यर्थ ऑलंपीक सोहळा घोशीत केला होता. ही स्पर्धेची परंपरा १२७८ पर्यंत चालली. इ.स. ३६४ साली रोमन सम्राट थिओडोमस यांनी हया स्पर्धा बंद केल्या. त्यानंतर १६ जुन १८६४ ला ऑलंपीक स्पर्धा सुरू करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली व अॅथेन्समध्ये (भूमीत) स्पर्धा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला व १६६६ पासुन पहिले व दुसरे महायुध्द सोडले तर आजपर्यंत ही ज्योत तेवत आहे.

प्राचीन ग्रीक ऑलंपीकमध्ये अॅथलेटिक्समधले बहुतांष क्रिडा प्रकार खेळले जात होते. परंतु भालाफेक, थाळीफेक, धावणे, उडी मारणे हे प्रकार एकाच नावाच्या छत्राखाली बांधले गेले नव्हते. अॅथलेटिक्स हा षब्द १६ व्या शतकात अस्तित्वात आला. प्राचीन ग्रीकमध्ये प्रत्येक क्रिडा प्रकाराची सुरूवात धार्मिक विधिने होत असे. ग्रिक तत्वज्ञ प्लेटो व ॲरिस्टॉटल यांची ॲकॅउमी व लेसीयन ही मुक्त विद्यापीठाचे स्वरूप असणारी जिमनॉटीयम अथवा खेळाची खुली मैदाने व अभ्यासकेंद्र अष्या स्वरूपाची होती. परंतु भारतीय संस्कृती प्रमाणेच ग्रिक संस्कृतीमध्येही महिलांचा सहभाग नगबघ होता असें आढळुन येते.

*•ऑलंपीक स्पर्धा*

| अनु. क्र. | इ.स. | स्थळ | संख्या सहभागी देश | संख्या क्रिडा प्रकार | खेळाडु | महिला |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1896 | ॲथेन्स (ग्रिक) | 14 | 43 | 241 | 00 |
| 2 | 1900 | पॅरिस (फ्रांन्स) | 24 | 95 | 997 | 22 |
| 3 | 1904 | सेंट व्हईस (अमेरिका) | 12 | 91 | 645 | 06 |
| 4 | 1908 | लंडन (इंग्लंड) | 22 | 110 | 2008 | 37 |
| 5 | 1912 | स्टॉकहोम (स्विडन) | 28 | 102 | 2407 | 48 |
| 6 | 1916 | बर्लिन (जर्मनी) | रद्य दुसरे महायुध्द | | | |
| 7 | 1920 | ॲटबर्न (बेल्जियम) | 29 | 154 | 20626 | 65 |
| 8 | 1924 | पॅरिस (फ्रांन्स) | 44 | 126 | 3089 | 135 |
| 9 | 1928 | ॲथेस्टरडॅम (हॉलंड) | 46 | 109 | 2883 | 277 |
| 10 | 1932 | लॉस ॲलेडिस (अमेरिका) | 37 | 117 | 1332 | 126 |
| 11 | 1936 | ब्र्लिन (जर्मनी) | 49 | 129 | 3963 | 331 |
| 12 | 1940 | टोकियो (जपान) | रद्य महायुध्द | | | |
| 13 | 1944 | लंडन (इंग्लंड) | रद्य महायुध्द | | | |
| 14 | 1948 | लंडन (इंग्लंड) | 59 | 136 | 4104 | 390 |
| 15 | 1952 | खेळसिंडी (फिनलॅंड) | 69 | 149 | 4995 | 519 |
| 16 | 1956 | मेलबॉर्न (ऑस्ट्रेलिया) | 72 | 145 | 3314 | 376 |
| 17 | 1960 | रोम (इटली) | 83 | 150 | 5338 | 611 |
| 18 | 1964 | टोकियो (जपान) | 93 | 163 | 5151 | 678 |
| 19 | 1968 | मॅसिको (मेस्किको) | 112 | 172 | 5516 | 781 |
| 20 | 1972 | म्युनिक (प.जर्मनी) | 121 | 195 | 7134 | 1059 |
| 21 | 1976 | मॉनटियन (कॅनडा) | 92 | 198 | 6084 | 1060 |
| 22 | 1980 | मास्को (रसिया) | 80 | 203 | 5176 | 1115 |
| 23 | 1984 | लॉस ॲलेडिस (अमेरिका) | 140 | 221 | 6829 | 1566 |
| 24 | 1988 | सेऊल (द.कोरिया) | 159 | 237 | 8391 | 2194 |
| 25 | 1992 | मार्सिलेना (स्पेन) | 169 | 257 | 9356 | 2704 |
| 26 | 1996 | ॲटलंटा | 197 | 271 | 10318 | 3152 |
| 27 | 2000 | सिडनी (ऑस्ट्रेलिया) | 199 | 300 | 10651 | 4069 |
| 28 | 2004 | ॲथेन्स (ग्रिस) | 201 | 301 | 10625 | 4329 |
| 29 | 2008 | बिजिंग (चिन) | रद्य स्वतंत्र तिबेट | | | |
| 30 | 2012 | लंडन (इंग्लंड) | 204 | 302 | 10490 | |

•ऑलंपीकच्या खेळांच्या तालिकेवर नजर टाकल्यास असे आढळुन येते की, प्राचीरन ग्रिकमध्ये होणा–या खेळात महिला समाविश्ठ नव्हत्या व नविन ऑलंपीकमध्ये १८९६ चे पहिले ऑलंपीक सोडले तर प्रत्येक स्पर्धेमध्ये २२ महिला पासुन ५००० महिला स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या होत्या.

ऑलंपीकमध्ये खेळले जाणारे खेळ ज्यामध्ये हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॅंडबॉल, टेबल टेनीस, टेनीस, सॉप्टबॉल, बेसबॉल, हॉलीबॉल हे बॉल्स गेम (खेळ) तसेच कुस्ती, मुश्टीयुध्द, ज्यदो, कराटे, ज्युदो–कराटे, तायकोंदो, वेटलिपटींग, हे झाटपटीचे खेळ, वॉटर पोलो, ड्रायव्हींग, सिंक्रोनाईजड, स्विमींग, रोइंग या जलतरण स्पर्धा, इकोस्टियन, सायकलिंग, धनुश्य नेमबाजी या सारख्या जिमनॅस्टिक घेतल्या जातात.

*•भारतीय महिला खेळाडुंचा दर्जा व कामगिरी*

वरिल स्पर्धामध्ये भारतीय महिला खेळाडुंच्या सहभागाचा विचार केल्यास असे आढळुन येते की, स्वातंत्र्यपुर्व काळात राश्ट्रीय व आंतराश्ट्रीय स्तरावर स्पर्धा वाढलेल्या नव्हत्या. परंतु स्वातंत्र्यानंतर स्पर्धा खुप वाढल्या आहेत. त्यांमध्ये भारतीय महिलांना टिकायचे असेल तर स्पर्धेसाठी कौषल्य त्यांनी षिकले पाहीजे. त्याच बरोबर त्यांचा समाजातील दर्जाही सुधारावा लागेल व अष्या स्पर्धामध्ये सहभागी होणा-या महिलांची परिस्थीती काय आहे. हे बघणे आवष्यक आहे. वरिल सर्व स्पर्धांमध्ये सहभागी होणा-या भारतीय महिलांचा अभ्यास केल्यास असे आढळुन येते की, ऑलंपीक पर्यंत पोहचणा-या महिलांमध्ये पी.टी. उशा (धावपटु), मल्लेष्वरी (वेटलिपटींग), मेरीकॉम (बॉक्सिंग), सायना नेहवाल (बॅडमिंटन) अष्या बोटावर मोजता येण्यासारख्या इतक्याच महिला ऑलंपिक पर्यंत पोहचल्या कामगीरी करू षकल्या आहेत.

•भारतातील पी.टी.उषा ऑलंपीकमध्ये सहभागी होण्यासाठी १९८४ साल उघडावे लागले परंतु ती कमनशिबी ठरली. २००० हे साल भारतीय महिलांचा जयजयकार करणारे ठरले. कारण वेटलिपटींग सारख्या अवघड प्रकारांमध्ये करनाम मल्लेष्वरीने कास्यपदक जिंकले व ऑलंपीकमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला ठरली. २००४ मध्ये धर्नेधनू अंजली वेदपाठक या पुण्याच्या महिलेने केलेला प्रयत्न अयश्स्वी ठरला. त्यावर्शी कुंजुराणी व प्रतिमाकुमारी उतेजक द्रव्य सेवनात दोशी आढळल्यामुळे भारताची प्रतिमा मलीन झाल्याचे आरोप त्यांच्यावर करण्यात आले.२०१२ मध्ये मेरीकॉम बॉक्सींग व सायना नेहवाल बॅटमिंटन मध्ये या महिलांनी भारताचा तिरंगा फडकविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु सव्वाषेकोटी लोकसंख्येमध्ये एवढया अत्यल्प प्रमाणात महिला प्रतिनीधी ऑलंपीकपर्यंत पोहचतात.

•भारतीय महिला खेळाडुंची कामगीरी व इतिहास व त्यांची पार्ष्वभुमी बघीतली तर असे आढळुन येते की, मुळातच भारतात मुलींना स्पर्धात्मक खेळासाठी प्रोत्साहान दिले जात नाही. ग्रामीण भागत तर भातुकलीच्या खेळापलीकडे क्रीडाविष्व महिलांना माहीत नसते. अश्या वातावरणात चमत्कार आपोआप घडत नाहीत त्यासाठी अफाट जिद्द अथक परिश्रम करावयाची तयार ठेवावी लागते.व भारतासारख्या पुरूशप्रधान समाजामध्ये अष्या प्रकारच्या संधी महिलांना मिळणे फार कठीण आहे.

•भारतीय समाजातील महिला व पुरूशांमध्ये सामाजीक व कौटुंबीक व्यवस्थेतील स्थान त्यांचा दर्जा व त्यांच्या जीवनपध्दती या बद्दल अनादी काळापासुन परस्परविरोधी अष्या कल्पना प्रचलित आहेत.

•भारतामध्ये विविध जाती, जमातीमंध्ये व विविध प्रांतामध्ये भिन्न भिन्न परंपरा जोपासल्या जातात. स्त्रियांचे क्षेत्र चुल व मुल संभाळणे पर्यंत मर्यादीत समजले जाते. त्यांमुळे महिलांच्या हाती ना षस्त्र दिले जाते ना कधी मैदानावर स्वैरपणे खेळु दिले जाते.

•आधुनिक काळामंध्ये दैनंदिन व्यवहारांमध्ये महिला व पुरूषांना बरोबरीन आणण्याचा झालेला आहे. परंतु महिलांच्या सौदंर्यात पुरूशीपणा येवू नये या साठीच प्रयत्न केला जातो. त्यामुळे महिलांना ढाल व भाल यापासुन दुर ठवले जाते.

•पहिल्या व दुस-या महायुध्दानंतर जे अमुलाग्र बदल झाले त्यामंध्ये महिलांना क्रिडा क्षेत्राामंध्ये आकर्शित करण्याचा प्रयत्न झाला परंतु भारतात आर्थिक आमिश दाखविणे, स्वइच्छेची सक्ती करून अजिंक्यपद प्राप्त करण्यासाठी प्रवृत्त केले गेले व ही चुरस एवढी वाढली की महिला हया डोपिंग सारख्या अनैसर्गिक कृत्याला बळी पडल्या. (कंजुराणी, प्रतिमाकुमारी)

•भारतातील अंधश्रध्दा, गैरसमजुती व चालीरीतीमुळे महिलांची शारीरिक रचना, जडणघडण व त्यातुन स्त्री-पुरूश नैसर्गिक वास्तवाचे भान न राखवता अनेक वादंग निर्माण होतात. व पुरूषांच्या तुलनेत महिला खुपच कमजोर आहेत त्यांमुळे पुरूशांच्या बरोबरीने महिलांनी खेळु नये असा विचार प्रवाह आढळुन येतो. म्हणुन ऑलंपीकमध्ये महिलांचा सहभाग कमी आहे असे आढळुन येते.

•भारतांमध्ये राश्ट्रीय स्तरावर आंतराश्ट्रीय महिला क्रिडासंघटने प्रमाणे प्रभावी क्रिडा संघटना नाहीत व दुर्देवाने असे म्हणावे लागते की महिलांचे नेतृत्व करतील असे मार्गदर्षक नाहीत. (ना महिला ना पुरूश)

•ऑलंपीक स्पर्धेचा ११६ वर्षाचा इतिहास बघितला तर पुरूष व महिला मिळुन मोजल्यास भारतीयांनी ऑलंपीकमध्ये इतिहास घडवीला. त्यांमध्ये नॉर्मन पिजवर्ड (अॅथलेटिक्समध्ये) के.डी. जाधव (कुस्ती) लियंडरस्पेस (टेनीस) करनाम मल्लेष्वरी (वेटलिपटींग) आर. राठोंड (नेमबाजी) सायना नेहवाल (बॅडमिंटन) मेरीकॉम (बॉक्सिंग)

•भारतामध्ये ऑलंपीकमध्ये खेळल्या जाणा-या खेळांना क्रिकेट इतके महत्व दिले जात नाही. ऑलंपीकमध्ये पदक मिळवीणारे इतिहास घडवितात परंतु ते 'इंडियन आयडॉल' नसतात.

•भारतामध्ये राजकारणी लोकांनी ऑलंपीक संघटना ताब्यात घेतल्यामुळे त्यांमध्ये राजकारण घडले व त्यातुन पंचतारांकित क्रिडा संस्कृती उदयास आली त्यामुळे गुणवत्ता असणा-या क्रिडापटुंची निवड होत नाही.

•७०लोक ग्रामीन भागात राहतात. त्यांच्यापर्यंत ऑलंपीकचे वारे पोहचत नाही सर्व योजना षहरी भागात मर्यादीत राहतात. व महिला खेळाडुंचा सहभाग वाढविण्याचे प्रयत्न होत नाहीत असे आढळुन येते.

•भारतीय महिला खेळाडुंना कुटुंबातुन व समाजातुन प्रोत्साहन व मान , सन्मान मिळत नाही व त्यांचे प्रतिबिंब 'चक दे इंडिया' सारख्या सिनेमातुन पाहायला मिळते. व महिला खेळाडुं बद्दलची भारतीय समाजाची मानसिकता यातुन दिसुन येते.

•ज्या महिलांना खेळाची संधी मिळते त्यांनी आपले किंवा खेळाचे वर्चस्व सिध्द केलेले आहे. परंतु समाजात महिला प्रषिक्षिक किंवा खेळाचे शिक्षक म्हणने वेगळे व्यक्तीमत्व (पुरूशी) असे समजले जाते. त्यामुळे Bp.ed.,M.Ped. करणा-या महिलांषी विवाह करण्यास सर्वसामान्य पुरूश तयार नसतात. हे सत्य आहे.

•भारतीय महिलांना ऑलंपीकमध्ये खेळण्यासाठी परवानगी न देण्याचे आणखी एक कारण म्हणने ऑलंपीकमध्ये असणारा महिलाचा युनिफॉर्म किंवा ड्रेसकोड इतक्या तोटग्या कपडयांमुळे महिलांना बघण्याची सवय सर्वसामान्य भारतीयांना नसते त्यामुळे विरोध होतो.

•महिला बद्दलचे अनेक गैरसमज भारतीयांमध्ये आहेत. त्यांमध्ये महिला धाडशी नसतात, निर्णयक्षम नसतात, चिकाटी जिकांण्याची दृश्टी त्यांच्यामध्ये नसते असे मानषास्त्रीय कारणे निर्माण झालेली आहेत. म्हणुनही महिलांचा दर्जा हा दुय्यम व मागसलेला राहिलेल आहे व त्यामुळे ऑलंपीकमध्ये सहभाग कमी राहीलेला आहे.

### *निष्कर्श :*

•ऑलंपीक स्पर्धेमध्ये होणा–या महिलांच्या क्रिडा प्रकारात भारतात महत्व प्राप्त करून दिल जात नाही.
•महिला खेळाडुंना पुढे आणण्याचे षासकिय प्रयत्न कमी पडतात.
•महिला खेळाडुंच्या क्रिडा संघटनांचा अभाव आहे.
•राजकारण व खेळ हया एका नावाच्या दोन बाजु नाहीत या बद्दल सर्वसामान्य नागरीक जागरूक नाहीत.
•भारतीय महिला खेळाडु आजही परंपरागत बंधनात आडकलेल्या आहेत.
•भारतीतील गरिबी व मागासलेपणामुळे महिला खेळाडु अमिशाला व डोपिंगला बळी पडतात.
•महिला खेळाडुंवर होणा–या अन्यायाच्या विरोधात उभे राहावयाची क्षमता त्यांच्यात आहे परंतु त्यांना साहय्य मिळत नाही.

### *शिफारशी* :

•क्रिडाक्षेत्र व राजकारण यांची फारकत करणे आवष्यक आहे.
•प्रभावी क्रिडा संघटनांची निर्मीती करणे
•महिलांमध्ये आत्मविष्वास निर्माण होईल असे षिक्षण व प्रषिक्षण देणे.
•गुणवान महिला क्रिडापटुंची निवड करणे.
•क्रिकेट खेळा इतकीच प्रसिध्दी ऑलंपीक (ॲथलिटीक्स) खेळाडुंना मिळवुन देणे.
•महिला खेळाडुनी परंपरागत विचार मते यांमध्ये बदल करणे तरच २०१६ मध्ये महिलांची कामगीरी सुधारेल.
•महिला खेळाडुंच्या मानसिकतेमध्ये तसेच समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल होणे अवष्यक आहे.

### *संदर्भग्रंथ सुची :*


| ग्रंथ | | लेखक |
|---|---|---|
| १.ऑलंपीकमधील ॲथलिटीक्स<br>प्रकाषन : दिलीप प्रकाषन षनिवार पेठ, पुणे | – | हेमंत जोगदेव राजीव – दत्तात्रय बर्वे |
| २.वाटचाल ऑलंपीकची | – | प्रा. संजय दुधाने – डायमंड प्रकाशन पुणे |
| ३.Histry of Olympains | - | Edited by Martin Jylar and Phisoar |
| 4-Sports & Game | - | Edited by – V. Olivora |
| ५.स्त्री प्रष्नाची वाटचाल | – | प्रतिभा रानडे – पद्यगंधा प्रकाशन पुणे |
| ६.खेळांचा राजा ॲथलिटीक्स<br>प्रकाषन पुणे | – | प्रल्हाद सावंत – मॅरेथॉन , राम भागवत |
| ७.ऑलंपीकचा इतिहास<br>नांदेड | – | प्रा. के.एन. गंदगे – समर्थ पब्लीकशन |
| ८.शारिरीक शिक्षणाचा<br>इतिहास आणि तत्वे | – | प्रा. उत्तम घुमाळ – समर्थ पब्लीकेशन<br>नांदेड |